# <u>नियमीत दिवाणी मुकदमा नंबर ३८६/२०१७</u>
## <u>निशाणी क्रमांक ८६ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.३ ते ५ यानी स्टेटस–को आदेशाचा भंग केल्याने वादीविरुध्द फौजदारी कारवाई करण्याचे आदेश द्यावेत यासाठी दिलेला आहे.

२. अर्जात कथन आहे की, यातील वादी याने वाद मिळकतीमध्ये नवीन बांधकाम करु नये म्हणून नि.७२ द्वारे निरंतर ताकिद मागीतली असता दि.१९/०१/२०१९ रोजी वादीविरुध्द दावा मिळकतीत यथास्थिती ठेवण्याचे आदेश पारीत झालेले आहेत. मात्र त्यानंतर देखील वादी यांनी दावा मिळकतीतील बांधकाम थांबविले नाही. त्यांच्याविरुध्द पोलिस ठाण्यात तक्रार दिली असता पोलिसांनी त्यांच्याविरुध्द कारवाई केली नाही. वादी यांनी न्यायालयाच्या आदेशाचा अवमान केल्याने वादीविरुध्द फौजदारी कारवाई करण्याचे आदेश करण्यात यावेत.

३. सदर अर्जास यातील वादी यांनी म्हणणे देऊन हरकत घेतली आहे की, अर्ज खोटा व लबाडीचा आहे. वादीने कोणत्याही आदेशाचा भंग केलेला नाही. पोलिसांना अर्जात नमूद तक्रारीची दखल घेण्याचा अधिकार नाही. अर्ज कायदेशीर नाही. अर्जातील तक्रारीबाबत किरकोळ दिवाणी अर्ज दाखल होणे कायद्याला अभिप्रेत आहे. त्यामुळे सदरचा अर्ज हा चालण्यास अपात्र ठरत असल्याने अर्ज फेटाळण्यात यावा.

४. दोन्ही पक्षातर्फे वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

५. सदरचा दावा हा निरंतर ताकीद व ठरावासाठी दाखल झालेला आहे. दावा हा नि.५ व नि.७२ चौकशीवर प्रलंबीत आहे. वादी याने खरोखरच न्यायालयाच्या आदेशाचा भंग केला अगर कसे, याबाबत दोन्ही पक्षांकडून पुरावा येणे अपेक्षीत आहे. त्यामुळे मुळ दाव्याच्या कामी तसा पुरावा देण्याची संधी देऊन

मुळ दाव्याचे कामकाज लांबविणे व त्यामध्ये गुंतागुंत निर्माण करणे मुळीच उचित ठरत नाही. प्रतिवादींच्या अर्जातील तक्रारीबाबत प्रतिवादी यांनी स्वतंत्रपणे दिवाणी किरकोळ अर्ज दाखल करणे जरुरीचे आहे. याकामी अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी यांच्यावर न्यायालयाच्या आदेशाचा अवमान झाल्याबाबत पोलिसांमार्फत रितसर चौकशी होऊन फौजदारी करण्याचे आदेश करावेत ही विनंती प्रतिवादी क्र.३ ते ५ यांनी कोणत्या तरतुदीखाली केली हे प्रतिवादींनी कोठेही स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यातील सदरचा अर्ज हा कायद्याने चालण्यास पात्र ठरत नाही.सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## **आदेश**

निशाणी ८६ चा अर्ज खर्चासह रद्द करण्यात येत आहे.

सही/–

सांगली ( खा. अ. भेंडवडे )

दिनांक १३/०२/२०१९ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, सांगली